**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान,**
**आरोग्य विभाग**
**शुध्दीपत्रक**

**१५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता एमबीबीएस/बीएएमएस वैद्यकिय अधिकारी यांचे थेट मुलाखतीने पदभरतीबाबत.**

---

दिनांक :- ९/०१/२०२४

राष्ट्रीय आरोग्य अभियान १५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांतर्गत एमबीबीएस वैद्यकिय अधिकारी यांची रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे भरणेकरीता जाहिर प्रकटन करण्यात आलेले होते.

सद्यस्थितीमध्ये एमबीबीएस पदवीधारक उपलब्ध होत नसल्याकारणाने एमबीबीएस पदवीधारकांऐवजी बीएएमएस पदवी धारक १५ वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रांकरीता राज्य शासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार भरणेकरीता शुध्दीपत्रक जाहिर करण्यात येत आहे.

वैद्यकिय अधिकारी यांची नेमणुक करताना शासनाने दि.०७/१२/२०२३ रोजीच्या दिलेल्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे

- १५ वा वित्त आयोगा अंतर्गत नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रातील वैद्यकिय अधिकारी म्हणून एम. बी.बी.एस पदवीधारकांच्या नियुक्तीला प्राधान्य देण्यासाठी केंद्र शासनाने सूचविले आहे. त्यानुसार नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रातील वैद्यकिय अधिकारी पदांकरीता एम.बी.बी.एस पदवीधरकांची नियुक्ती करणेकरीता प्राधान्य देण्यात येईल.
- परंतू अनेक प्रयत्न करुनही एम.बी.बी.एस पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास,१५ वा वित आयोग अंतर्गत नागरीआरोग्य वर्धीनी केंद्राकरीता वैद्यकिय अधिकारी म्हणून एम.बी.बी. एस पदवीधारक उमेदवार उपलब्ध होई पर्यंत अथवा ६ ते ११ महिन्यांकरीत बी.ए.एम.एस. पदवीधारक उमेदवारांना वैद्यकिय अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.
- सदर बी.ए.एम.एस पदवीधारक वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मनुष्यबळ विभागाचे दि.०९/०६/२०२३ रोजीचे पत्र जा.क्र.राआसोमु/ मुनष्यबळ कक्ष/पदभरती/३४३५४-७०१/२०२३ नुसारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येईल.
- सदर बी.ए.एम.एस पदवीधारक वैद्यकिय अधिकारी पदांकरीता केंद्रशासनाच्या सीपीएचसी च्या मार्गदर्शक सूचनांनुसार रु.२५,०००/- अधिक रु.१५,०००/-(पीबीआय) कामावर आधारित मोबदला याप्रमाणे प्रती महिना रु.४०,०००/- मानधन मार्गदर्शक सूचनांनुसार अदा करण्यात येईल.

पात्र असलेल्या उमेदवारांनी मुलाखतीकरीता येताना आपली शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक असणारी कागदपत्रे मुळ व एक झेरॉक्स कॉपी सोबत आणावी. सदर कागदपत्रांमध्ये जातीचा दाखला/पडताळणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

तरी सदर मुलाखती दर महिन्याच्या दर मंगळवारी आयोजित करण्यात येत आहे. सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्याच्या पुढील दिवशी मुलाखतीकरीता उपस्थित राहावे.

मुलाखतीकरीता उपस्थित राहणेकरीता तपशिल खालीलप्रमाणे :-

**स्थळ :- ४ था मजला, शिवनेरी सभागृह,जिल्हा परिषद पुणे**
**वेळ :-सकाळी ११.३० वाजता**

××××
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे**

Scanned with OKEN Scanner